The journey of success started when the Dramatic Soceity of Sydenham College reached the finals of the Indian National Theater for the first time with one act play "Sachin Sachin" winning best actor in the year 2014. We doubled our success by securing 3rd place in the YOUTH FESTIVAL and also winning the best actor organised by Mumbai University with One Act Play "Noor-e-Ramzan" in the year 2015. And then comes the year 2016 when the Dramatic Society bagged a total of 30 awards. They are:

*Indian National Theater*
1] Secured 2nd Place
2] Best Writer - 1st
3] Best Actress - 1st
4] Best Actor - 2nd

*Vighnaharta Karandak State Level Competition*
1] Secured 1st Place
2] Best Director - 1st
3] Best Actor - 1st
4] Best Actress - 1st
5] Best Actress - Consolation

*Uttunga State Level Competition*
1] Secured 1st Place
2] Best Writer - 1st
3] Best Director - 1st
4] Best Actor - 1st
5] Best Actress - 1st
6] Most Attractive Actress

*Jallosh State Level Competition*
1] Secured 1st Place
2] Best Writer - 1st
3] Best Director - 1st
4] Best Set - 1st
5] Best Music - 1st
6] Best Actor - 1st
7] Best Actress - 1st

*Umbartha State Level Competition*
1] Best Actress - 1st

*Lokankika Mumbai Region Competition
1] Secured 2nd Place
2] Best Writer - 1st
3] Best Music - 1st

*Spandan Inter collegiate Competition*

1] Secured 2nd Place
2] Best Actress - 1st
3] Best Writer - 1st

*Chaturang Sawai State Level Competition*
1] Finalist
2] Best Actress - 1st





पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे. पाच लाख रुपये, मानपत्र आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्कारांचे स्वरूप असेल.

रंगभूमी दिनाचे औचित्य साधत सांस्कृतिक कार्यमंत्री विनोद तावडे यांनी शनिवारी या पुरस्कारांची घोषणा केली. लीलाधर कांबळी यांनी 'काचेचा चंद्र', 'सौभाग्य', 'हिमालयाची सावली', 'दुभंग', 'कस्तुरीमृग', 'वात्रट मेले' या नाटकांमधून आपल्या अभिनयाची छाप उमटवली आहे. 'नयन तुझे

नाट्यअभिनेते आणि उत्तम गायक म्हणून प्रसिद्ध आहेत. संगीत नाटकांमध्ये विनोदी भूमिका ही त्यांची खासियत आहे. 'पंडितराज जगन्नाथ' नाटकाद्वारे १९६८मध्ये ते नट म्हणून ठळकपणे पुढे आले. त्यानंतर 'बावनखणी', 'रक्त नको मज प्रेम हवे', 'दुरितांचे तिमिर जावो', 'मदनाची मंजिरी', 'मंदारमाला', 'जय जय गौरी शंकर' या नाटकांतील त्यांच्या भूमिका गाजल्या.

व्यक्तीकडून मिळालेल्या शाबासकीत असा काही जिव्हाळा असतो की त्यांची शाबासकी अपूर्वाईची वाटते. अशी भावना विको परिवारातर्फे व्यक्त करण्यात आली आहे. दादर येथील राजा शिवाजी विद्यालयातील बी.एन. वैद्य सभागृहात २ जानेवारी, २०१७ रोजी पुरस्कार प्रदान सोहळा होणार आहे. त्यास राज्याचे उद्योगमंत्री सुभाष देसाई प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

---

### उत्तुंग एकांकिका स्पर्धेची अंतिम फेरी संपन्न

# 'शामची आई' सर्वोत्कृष्ट

**सूरज कांबळे,** कॉलेज क्लब रिपोर्टर




खुल्या राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेच्या वर्तुळात मानाची समजल्या जाणारी रचना कला केंद्र आणि अनिरुद्ध थिएटर्स आयोजित 'उत्तुंग' राजस्तरीय खुल्या एकांकिका स्पर्धेची अंतिम फेरी ४ नोव्हेंबरला माटुंग्याच्या यशवंत नाट्य मंदिरात पार पडली. स्पर्धेचे यंदाचे नववे वर्ष होते. यात सिडनहॅम कॉलेजच्या 'शामची आई' या एकांकिकेने प्रथम पारितोषिकासह सहा बक्षिसे पटकावली. झिरो बजेट प्रॉडक्शनच्या 'ओवी'या एकांकिकेने तांत्रिक बक्षिसे मिळवत द्वितीय क्रमांक पटकावला. शरद पोंक्षे, हेमांगी कवी आणि अद्वैत दादरकर यांनी परीक्षणाचे काम केले. महाराष्ट्र टाइम्स या स्पर्धेचा मीडिया पार्टनर होता.

प्राथमिक फेरीतील ४० एकांकिकांमधून अंतिम फेरीसाठी सहा एकांकिकांची निवड झाली होती. 'ओवी', 'श्यामची आई' यांच्यासह वर्क इन प्रोग्रेसची 'सर्कस', फोर्थ वॉल, ठाणे यांची 'रात्रीस खेळ चाले', मैत्री कला मंचची 'बोन्साय', जागर आर्ट ऑफ नेशनची 'ग्रीड अँड फियर' या एकांकिका अंतिम फेरीत सादर झाल्या. आई आणि मुलाचे नाते सांगणाऱ्या 'शामची आई' या एकांकिकेने प्रथम पारितोषिक तर पटकावलेच, शिवाय सर्वोत्कृष्ट अभिनेत्री (मृणालिनी तांबडकर), सर्वोत्कृष्ट अभिनेता (साई निरावडेकर), सर्वोत्कृष्ट लेखक (स्वप्नील जाधव), सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक (स्वप्नील बारस्कर) आणि लक्षवेधी अभिनय (प्रियांका शिरसेकर) ही पारितोषिकेही मिळवली. 'ओवी'ने नेपथ्य (देवाशिष भरवडे), प्रकाश योजना (भूषण देसाई) आणि संगीत (संकेत-प्रथमेश) ही तिन्ही तांत्रिक बक्षिसे पटकावली. शिवाय मानसी प्रभुलकर हिला अभिनयाचे द्वितीय पारितोषिक आणि अनिकेत पाटील याला दिग्दर्शनाचे द्वितीय पारितोषिके मिळाले. 'बोन्साय'ला लक्षवेधी एकांकिकेच्या पारितोषिकासह मयूर निमकर याला अभिनयाचे द्वितीय पारितोषिक मिळाले.

'सगळ्याच सहभागी संस्थांनी काही तरी वेगळे देण्याचा प्रयत्न केला असला तरी स्पर्धेतून अपेक्षित सादरीकरणे बघायला न मिळाल्याने निराशा झाली', असे मत परीक्षक अद्वैत दादरकर याने व्यक्त केले. तर, 'मी परीक्षक म्हणून बघण्यापेक्षा प्रेक्षक म्हणून एकांकिका बघत होते. त्यामुळे मजा आली. सगळ्यांनी खूप छान प्रयत्न केले', असे हेमांगी कवी हिने सांगितले. 'लेखकांना खूप चांगले विचार मांडायचे होते, पण ते प्रभावीपणे मांडले गेले नाहीत. त्यासाठी सगळ्या लेखकांनी जुनी नाटके वाचून काढायला हवीत', असे शरद पोंक्षे आपले मत व्यक्त करताना म्हणाले. स्पर्धकांनी चांगला प्रयत्न केला असल्याचेही त्यांनी नमूद केले.

